वाचा :- 1) पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम,2014

2) महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन)(महाराष्ट्र)नियम,2016

3) पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना,2017

4) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील पत्र क्र.रानाउअ 2014/SUSV/सुचना/का-16/4216 दिनांक 26 सप्टेंबर 2017

---

जा.क्र.नमुंमपा/परवाना विभाग/श.फे.स.नि./४८९६/2017

दिनांक २७/10/2017

आदेश :-

ज्याअर्थी केंद्र शासनाने "पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, 2014" पारीत केलेला असून राज्य शासनामार्फत अधिनियमातील कलम-36(1) मधील तरतुदीनुसार " महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, 2016" तसेच कलम 38(1) नुसार "पथ विक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, 2017" मंजूर करण्यात आलेले आहेत,

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक-02 मधील प्रकरण - चार, अ.क्र.11 (2) नुसार महापालिका क्षेत्रासाठी नगर पथ विक्रेता समितीची रचना शासनाने निश्चित करुन दिलेली आहे ;

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक-02 मधील प्रकरण - चार, अ.क्र.11 (2) (ख) इतर मंडळे यामधील अ.क्र. 02 ते 05 मधील घटकातील सदस्यांची समितीवर नियुक्ती होणेकरिता महापालिकेने वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर सुचनेच्या अनुषंगाने इच्छुक संबंधित घटकांकडून महापालिकेस अर्ज प्राप्त झालेले आहेत ;

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक-02 मधील प्रकरण - चार, अ.क्र.11 (2) (ख) इतर मंडळे यामधील अ.क्र. (एक) पथ विक्रेते या घटकातील सदस्यांची समितीवर नियुक्ती करणेची कार्यवाही संदर्भ क्रमांक-02 मधील प्रकरण -चार, अ.क्र. 14 ,15 व 16 नुसार कामगार आयुक्त यांचे कार्यालयामार्फत करण्यात येणार आहे ;

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक- 02 मधील प्रकरण - चार, अ.क्र.13 नुसार पदसिध्द सदस्यांचा अंतर्भाव असलेल्या नगर पथ विक्रेता समितीस महापालिकेने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जामधून सदस्यांची निवड करावयाची आहे ;

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक-02 मधील प्रकरण - चार, अ.क्र.11 (2) (ख) इतर मंडळे यामधील अ.क्र. 02 ते 05 मधील घटक सदस्यत्वासाठी प्राप्त झालेल्या अर्जामधून गुणात्मक पध्दतीने समितीवर सदस्य नियुक्ती करणेकरिता निम्नस्वाक्षरीकार यांचे अध्यक्षतेखाली नवी मुंबई महानगरपालिका शहर फेरीवाला समिती पदसिध्द सदस्यांची दिनांक 21/07/2017 रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती ;

त्याअर्थी मी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका उपरोक्त बाबी विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र-"अ" मध्ये नमूद केलेप्रमाणे शहर फेरीवाला समितीवर संदर्भ क्र.-2 मधील प्रकरण-चार, अ.क्र.11 (2) (क) शासकीय विभाग व (ख) इतर मंडळे यामधील अ.क्र. 02 ते 05 मधील घटकातील सदस्य नियुक्तीस मान्यता देऊन नवी मुंबई महानगरपालिका शहर फेरीवाला समिती या आदेशान्वये गठीत करीत आहे.

सदर आदेश सर्व संबंधितांना तात्काळ निर्गमित करण्यात यावा.

आयुक्त

नवी मुंबई महानगरपालिका

सोबत :- प्रपत्र "अ"

प्रत :- सर्व संबंधितांस

Scanned by CamScanner

**प्रपत्र "अ"**

शहर फेरीवाला समिती सदस्य

(आदेश क्रमांक :- जा.क्र.नमुंमपा/परवाना विभाग/श.फे.स.नि./ /2017 दि. /10/2017)

| अ. क्र. | शासकीय विभाग | अ.क्र.11 (2) (ख) इतर मंडळे यामधील | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.क्र. 02 :- समुदाय आधारित संघटना | अ.क्र.02 :-अशासकीय संघटना | अ.क्र. 03 :- निवासी कल्याण संघ | अ.क्र. 04 :- व्यापारी संघाचा प्रतिनिधी | अ.क्र. 05 :- पणन संघाचा प्रतिनिधी | अ.क्र. 06 :- अग्रणी बँकेचा प्रतिनिधी |
| 01 | आयुक्त, नमुंमपा तथा अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती | श्री.विनोद विनायक म्हात्रे, सदस्य | श्री.शिवाजी भगवान जाधव, सदस्य | श्री.देव प्रेमनाथ शर्मा, सदस्य | श्री.प्रमोद रघुनाथ जोशी, सदस्य | जागा रिक्त | जागा रिक्त |
| 02 | पोलिस आयुक्त, नवी मुंबई तथा सदस्य, शहर फेरीवाला समिती | | | | | | |
| 03 | उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको तथा सदस्य, शहर फेरीवाला समिती | | | | | | |
| 04 | पोलिस उप आयुक्त (वाहतुक), नवी मुंबई तथा सदस्य, शहर फेरीवाला समिती | | | | | | |
| 05 | सहा.संचालक नगररचना,नमुंमपा तथा सदस्य् शहर फेरीवाला समिती | | | | | | |
| 06 | वैदयकीय आरोग्य अधिकारी,नमुंमपा तथा सदस्य् शहर फेरीवाला समिती | | | | | | |

**विशेष निमंत्रीत** :- 1) मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.आय.डी.सी.2) अतिरिक्त आयुक्त (शहर) 3) शहर अभियंता, नमुंमपा 4) उप आयुक्त (परवाना)-समन्वयक, नमुंमपा 5) उप आयुक्त (अतिक्रमण), नमुंमपा 6) उप आयुक्त (मालमत्ता), नमुंमपा 7) उप आयुक्त (परिमंडळ-1/2), नमुंमपा 8) कनिष्ठ विधी अधिकारी, नमुंमपा

**आयुक्त**

**नवी मुंबई महानगरपालिका**

Scanned by CamScanner